महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग कुर्डूवाडी

ता.माढा जि.सोलापूर
दुरध्वनी क्रमांक 02183 - 223261,

संकलन - आस्थापना
ई. मेल - sdomadha@gmail.com

---

क्र./आस्था/कावि/1139/23 दिनांक -14.9.2023

प्रति,

मा.जिल्हा माहिती अधिकारी,
कार्यालय सोलापूर

**विषय - पोलीस पाटील रिक्त पदे भरती प्रक्रिया सन -2023**
**जाहीरनामा प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन माढा उपविभागांतर्गत माढा व करमाळा तालुक्यातील रिक्त पोलीस पाटील पदे भरती - 2023 बाबतचा जाहीरनामा ( एकूण पृष्ठ 7) यासोबत जोडुन पाठविण्यात येत आहे. **सदरचा जाहिरनामा दोन लोकप्रिय दैनिकामध्ये दि. 15 /9/2023 रोजी प्रसिध्द करणेत यावा. व सदर जाहिरनामा प्रसिध्द झालेल्या वर्तमानपत्राच्या 2 प्रती या कार्यालयास देयकाचे 2 प्रतिसह पाठविण्यास विनंती आहे.**

Priyanka 14/09/23

(प्रियंका आंबेकर)
**उपविभागीय दंडाधिकारी**
**माढा विभाग कुर्डुवाडी तथा**
**अध्यक्ष पोलीस पाटील भरती -2023**

प्रत - मा.जिल्हादंडाधिकारी सोलापूर (गृह शाखा) यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत - जिल्हा विज्ञापन व सूचना अधिकारी (NIC) जि.सोलापूर

2/- उक्त नमुद जाहिरनाम्याची प्रत सोबत संलग्न केली आहे. सदरचा जाहिरनामा सोलापूर जिल्हयाच्या संकेतस्थळावर अपलोड करुन प्रसिध्द करणेत यावी.

पोलीस पाटील रिक्त पद भरती - 2023
क्रमाक पोपा भरती/कावि/1138/2023
उपविभागीय दंडाधिकारी, माढा विभाग कुर्डुवाडी
दिनांक- 14.09.2023

# जाहीरनामा

उपविभागीय दंडाधिकारी, माढा विभाग कुर्डुवाडी यांचेकडुन हा जाहीरनामा प्रसिध्द करुन त्याद्वारे उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी, **उपविभागातील माढा व करमाळा तालुक्यातील** सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, सोबतच्या जात प्रवर्गनिहाय, रिक्त पोलीस पाटील पदावर नेमणुक केली जाणार आहे. ज्या व्यक्तीस पोलीस पाटील म्हणुन काम करणेची इच्छा आहे, त्यांनी आपले अर्ज दिनांक 18.9.2023 पासुन दिनांक 03.10.2023 पर्यंत ( शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) कार्यालयीन वेळेत उपविभागीय दंडाधिकारी, माढा विभाग कुर्डुवाडी यांचे कार्यालयात समक्ष सादर करावेत. या मुदतीनंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच पोष्टाने अथवा अन्य सेवेद्वारे आलेले अर्जही विचारात घेतले जाणार नाहीत. पोलीस पाटील पदासाठी जाहीरनाम्यात नमुद केलेल्या अटी व पात्रतेची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांनीच अर्ज करावेत. अर्ज शुल्क सर्वासाठी प्रती फॉर्म रक्कम रुपये 100/- (अक्षरी शंभर रुपये ) इतकी राहील.अर्ज,माहितीपत्रक प्रतिज्ञापत्र, नमुद इत्यादी कागदपत्रे दिनांक 18.9.2023 ते दिनांक 03.10.2023 पर्यंत ( शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन ) कार्यालयीन वेळेत उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी यांचे कार्यालयातुन उपलब्ध करुन घ्यावेत.

**पोलीस पाटील पदावरील भरतीचा कार्यक्रम सन - 2023**

| अ.नं. | तपशील | तारीख/ठिकाण/वेळ |
|---|---|---|
| 1 | जाहीर नामा प्रसिध्दीचा दिनांक | दिनांक-14/9/2023 |
| 2 | अर्ज करणेचा कालावधी पासून ते पर्यंत व वेळ | दिनांक 18/9/2023 ते 3/10/2023 सुट्टीचे दिवस वगळून<br>वेळ - सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| 3 | अर्जाची छाननी दिनांक | दिनांक 5/10/2023 ते 9/10/2023 |
| 4 | पात्र अर्जाचे उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि.13/10/2023 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत (उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी कार्यालय आणि संबंधित तहसिल कार्यालय) |
| 5 | उमेदवारास प्रवेशपत्र देणे | दि.16/10/2023 ते दि.19/10/2023<br>ठिकाण - उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी<br>प्रवेशपत्र प्राप्त न झाल्यास दिनांक 20/10/2023 रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी या कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावे. |
| 6 | परीक्षा ठिकाण, दिनांक व वेळ | उपविभागीय अधिकारी कार्यालय क्षेत्रातील सोयीच्या ठिकाणी रविवार दिनांक 22/10/2023<br>वेळ- सकाळी 11.00 ते 12.30 |

| | | |
|---|---|---|
| 7 | लेखी परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दिनांक 25/10/2023 (उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी कार्यालय आणि संबंधित तहसिल कार्यालय) |
| 8 | उत्तीर्ण उमेदवारांचे मुळ कागदपत्रांची छाननी व तोंडी मुलाखत दिनांक वेळ व ठिकाण | दिनांक- 26/10/2023 ते दिनांक-31.10.2023 शासकीय सुट्टीचे दिवस धरुन सकाळी 11.00 वाजलेपासून<br>ठिकाण - उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी . |
| 9 | पात्र उमेदवारांची अंतीम निवड यादी प्रसिध्दी दिनांक व ठिकाण | शुक्रवार दि.3/11/2023<br>ठिकाण - उपविभागीय कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी |

अटी व शर्तीः-

1. उमेदवार यांनी महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील अधिनियम 1967 व महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील (नेमणुक, पगार, भत्ते आणि नोकरीच्या इतर शर्ती) आदेश, 1968 मधील सर्व तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. उक्त अधिनियम व आदेशातील कोणत्याही तरतुदीचे पालन न केल्यास उमेदवार यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
2. अर्ज करणाऱ्या व्यक्तीचे **वय दिनांक.14/9/2023 रोजी 25 वर्षापेक्षा कमी व 45 वर्षापेक्षा जास्त नसावे**. (वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याच्या दाखल्याची किंवा जन्म तारखेच्या दाखल्याची सत्यप्रत आवश्यक)
3. अर्ज करणाऱ्या व्यक्तीची शैक्षणिक पात्रता ही इयत्ता 10 वी उत्तीर्ण असावी. (शैक्षणिक पात्रतेच्या /माध्यमिक शालांत परीक्षा पुराव्याच्या कागदपत्रांच्या सत्यप्रती.)
4. अर्जदार व्यक्ती त्याच गावचा स्थानिक रहिवाशी असणे आवश्यक आहे. तहसिलदार यांचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.
5. अर्जदार व्यक्ती पोलीस पाटील पदाची कर्तव्ये बजाविणेस शारीरीकदृष्टया सक्षम असावा.
6. अर्जदार व्यक्तीस कोणत्याही गुन्हयात कोणत्याही प्रकारचा दंड अगर शिक्षा झालेली नसावी.
7. अर्जदार व्यक्तीची पोलीस पाटील पदी नेमणूक झाल्यास त्यास राजकारणात भाग घेता येणार नाही किंवा राजकीय पक्षाचा सभासद राहता येणार नाही.
8. अर्जदार व्यक्ती सरकारी थकबाकीदार नसावी. (तलाठी /ग्रामसेवक यांचा दाखला.)
9. वर नमूद केलेल्या पात्रतेबरोबरच निवडीकरीता इयत्ता 10 वी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित 80 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल यामध्ये सामान्य ज्ञान, गणित ,स्थानिक परिसराची माहिती व चालू घडामोडीचा समावेश असेल.
10. लेखी परीक्षेमध्ये 80 गुणापैकी किमान 36 गुण (45%) प्राप्त करणारे उमेदवार तोंडी परीक्षेस पात्र ठरतील. तोंडी (मुलाखत) परीक्षा 20 गुणांची असेल. तोंडी (मुलाखत) परीक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तोंडी परीक्षेस अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतिम निवडी करिता अपात्र ठरेल.
11. अर्जदारास मराठी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य आहे.इयत्ता 10 वी ला मराठी भाषेत उत्तीर्ण झालेचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
12. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे व नॉनक्रिमीलेअर (उन्नत गटात मोडत नसलेबाबत ) NCL प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील. (अज / खुला सर्वसाधारण वगळून) तसेच निवड झालेल्या उमेदवारांनी जातीचे वैधता प्रमाणपत्र निवड झाले दिनांकापासून सहा महीन्याचे आत हजर करणे बंधनकारक राहील.(खुला प्रवर्ग वगळून)

13. दिनांक 28 मार्च 2005 व तद्नंतर अर्जदारास दोन पेक्षा जास्त अपत्ये असल्यास अर्जदार अपात्र राहील. त्याबाबत लहान कुटुंबाचे परिशिष्ट ब मधील प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
14. ज्या प्रवर्गासाठी पद आरक्षित असेल त्यास प्रवर्गातील व्यक्तीने अर्ज करणे बंधनकारक आहे.अन्यथा अर्ज अपात्र करण्यात येईल.
15. अर्जदाराने परीक्षेस येताना स्वखर्चाने यावे.
16. अर्ज सादर करते वेळी अर्ज शुल्क रक्कम रुपये 100/- व परीक्षा शुल्क म्हणून मागासवर्ग व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांकरिता रु.300/- व खुल्या प्रवर्गासाठी रु.500/- उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी यांचे कार्यालयात रोखीने जमा करणे आवश्यक राहील.
17. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात खोटी अगर चुकीची माहिती सादर केली तर झालेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल.
18. यापूर्वी कोणी अर्ज केले असतील तर ते विचारात घेतले जाणार नाहीत. सबब या जाहीरनाम्यानुसार पुन्हा अर्ज करणे आवश्यक राहील.
19. मुलाखतीस पात्र उमेदवारांची फक्त यादी प्रसिध्द करणेत येईल त्यांचे गुण प्रसिध्द केले जाणार नाहीत.
20. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (EWS) उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक. रअधो-4019/प्र.क्र.31/16-अ दिनांक 12 फेब्रुवारी 2019 व दिनांक 31 मे 2021 अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र , अर्ज करतेवेळी सादर करणे बंधनकारक आहे.
21. अद्यावत नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र /आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणुन सक्षम प्राधिकाऱ्याने वितरीत केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
22. सदर पोलीस पाटील निवड ही केवळ 5 वर्षे कालावधीकरीता केली जाणार आहे. पुढील कालावधीचे नुतनीकरणाबाबतचा निर्णय त्या त्या वेळी स्वतंत्र्यरित्या घेण्यात येईल.
23. भरती कार्यक्रम पत्रिकेमध्ये नमुद तारखेच्या विहीत दिनांकानंतर सादर केलेले कोणतेही कागदपत्र ग्राहय धरले जाणार नाहीत.
24. कोणत्याही टप्प्यावर आक्षेपाबाबतचा अंतिम निर्णय हा अध्यक्ष पोलीस पाटील भरती प्रक्रिया -2023 तथा उपविभागीय दंडाधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी यांचा असेल.

**अर्जदार व्यक्तीने त्यांचे अर्जासोबत खालीलप्रमाणे पुराव्याची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. व मुलाखतीचेवेळी मुळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.**

1. शैक्षणिक पात्रतेच्या / माध्यमिक शालांत परिक्षा पुराव्याच्या कागदपत्रांच्या (स्वयंसाक्षांकित प्रती)
2. वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याच्या दाखल्याची किंवा जन्म तारखेच्या दाखल्याची (स्वयंसाक्षांकित प्रत.)
3. संबंधीत गावचा स्थानिक रहीवाशी असलेबाबत तहसिलदार यांचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
4. आरक्षीत संवर्गातील अर्जदाराने पुरावा म्हणून सक्षम प्राधिकारी यांचे दिलेले जातीचे प्रमाणपत्राची सत्यप्रत व अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती वगळून उर्वरित आरक्षण संवर्गासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे (NCL) नॉन क्रिमीलेअर सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्राची सत्यप्रत.

5. सरकारी थकबाकीदार नसलेबाबत तलाठी/ग्रामसेवक यांचा दाखला.
6. कोणत्याही गुन्हयात दंड अगर शिक्षा झाली नसलेबाबत आणि पोलीस पाटील पदासाठी चारित्र्य व वर्तणूक चांगली असलेबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी/ पोलीस निरीक्षक/ सहा.पोलीस निरीक्षक/ यांचा दाखला.
7. अर्जदाराने स्वत:चे पासपोर्ट आकाराचे अलीकडील काळात काढलेले दोन फोटो (दोन फोटोपैकी एक राजपत्रित अधिकारी यांचेकडुन साक्षांकीत करुन ) अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी चिकटविणे.
8. अर्जासोबत मागासवर्ग व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील अर्जदारांनी रु.300/- व खुल्या प्रवर्गासाठी अर्जदारांनी रु.500/- रोख जमा केलेची पावती जोडणेत यावी. सदरचे प्रवेश शुल्क हे ना परतावा असलेने परत मिळणार नाहीत.
9. शारिरीकदृष्ट्या सक्षम असलेचे शासकीय वैदयकीय अधिकारी यांचा मुळ दाखला.
10. दोन पेक्षा जास्त मुले नसलेबाबतचे परिशिष्ट क येथील नमुन्यातील नोटरी / तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र.
11. अर्जदार हा पोलीस पाटील पदाची पात्रता पुर्ण करीत असलेबाबत परिशिष्ठ ब मधील विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (रक्कम रुपये 100/- स्टॅम्पवरील तालुका कार्यकारी दंडाधिकारी / नोटरी पब्लिक यांचे समोरील)

टिप :- अर्जदार तोंडी परिक्षेस (मुलाखतीस) पात्र ठरलेस दिनांक 26/10/2023 ते 31/10/2023 रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी या ठिकाणी अर्जदाराने वरील सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती तपासणी करीता सादर करणे बंधनकारक आहे.

**निवड झालेल्या उमेदवारांने सादर करावयाची कागदपत्रे :-**

1. उमेदवारांने नियुक्ती आदेशाचे दिनांकापासून 6 महिनेचे आत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
2. शारीरीकदृष्टया सक्षम असलेबाबतचा जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडील प्रमाणपत्र एक महिन्याचे आत सादर करणे बंधनकारक आहे.
3. कोणत्याही गुन्हयात दंड अगर शिक्षा झाली नसलेबाबत आणि पोलीस पाटील पदासाठी चारित्र्य व वर्तणूक चांगली असलेबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक यांचा दाखला एक महिन्याचे आत सादर करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त नमुद केलेली 1 ते 3 कागदपत्रे अर्जदारांने मुदतीत सादर न केलेस झालेली निवड रद्द करणेत येईल.

**इतर सुचना**

1) लेखी परिक्षेचे ठिकाण व वेळ उमेदवारांना प्रवेश पत्राने दिनांक 20/10/2023 पुर्वी कळविली जाईल ( संबधीत गावचे तलाठी यांचेमार्फत) प्रवेशपत्र मुदतीत प्राप्त झाले नाही तर उमेदवारांने उपविभागीय अधिकारी कार्यालय , माढा विभाग कुर्डुवाडी यांचे कार्यालयातुन प्रवेश पत्र परिक्षेचे दिनाकांपुर्वी प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील प्रवेश पत्राशिवाय परिक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. पोलीस पाटील

भरतीचे कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांची पोलीस पाटील पदासाठीची अपात्रता निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांस अंतिम निवडीसाठी अपात्र ठरविले जाईल. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात आक्षेप / हरकत प्राप्त झालेस याबाबत उपविभागीय दंडाधिकारी , माढा विभाग कुर्डुवाडी यांचा निर्णय अंतिम राहील.

2) **मौजे. भूताष्टे ता.माढा येथील पोलीस पाटील पद हे दिनांक 31.12.2023 रोजी सेवानिवृत्तीने रिक्त होणार असलेने तद्नंतर सदर पदी निवड होणाऱ्या उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येईल.**

3) अर्जदाराने अर्जावर स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

( टिप :- उपविभागीय दंडाधिकारी, हे या नियुक्तीच्या बाबतीत प्रशासकीय (Administrative) आणि अर्धन्यायिक (Quasijudicial) अशी दुहेरी कर्तव्ये पार पाडत असल्यामुळे त्यांना जर एखादी व्यक्ती विहीत नियमांचे अथवा या संदर्भात शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशांचे पालन न करता सदरपदी निवड झाली असल्याचे वा अन्य कोणत्याही अन्यायकारक रितीने निवड झाली असल्याचे निदर्शनास आल्यास अशी नियुक्ती रद्द करण्यास ते स्वत: सक्षम आहेत. तसेच अर्जदार यांची चुकीची अथवा खोटी कागदपत्रे सादर केलेचे निदर्शनास आल्यास अर्जदारांची झालेली निवड / नियुक्ती रदद करणेत येईल. )

**ठिकाण- कुर्डुवाडी**
**दिनांक** -14/9/2023

Priyanka

**(प्रियंका आंबेकर)**
**अध्यक्ष पोलीस पाटील निवड समिती -2023 तथा**
**उपविभागीय दंडाधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी**

प्रत:- तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा / करमाळा यांचेकडे.
2/-सदरचा जाहिरनामा आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत- उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा /बार्शी
2/-सदरचा जाहिरनामा आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत- पोलीस निरीक्षक/ सहा.पोलीस निरीक्षक /माढा /करमाळा /कुर्डुवाडी व टेंभुर्णी
2/-सदरचा जाहिरनामा आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत:- गट विकास अधिकारी पंचायत समिती माढा / करमाळा
2/-सदरचा जाहिरनामा आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत:- गांव कामगार तलाठी---------------------ता.-----------

2/- सोबत जाहिरनाम्यांची प्रत पाठविली असुन सदरची प्रत चावडीचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी तसेच सदरचा जाहिरनामा दवंडीने प्रसिध्द करुन तात्काळ दवंडी रजिष्टरचे उताऱ्यासह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत:- ग्रामसेवक, ग्रामपंचायत-------------------------ता.

2/-सोबत जाहिरनाम्याची प्रत पाठविली असून सदरची प्रत ग्रामपंचायतीचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत- जिल्हा सुचना विज्ञान केंद्र सोलापूर

सोबत जाहिरनाम्याची प्रत पाठविली असून सदरची प्रत सोलापूर जिल्हयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी.

ठिकाण -कुर्डुवाडी

दिनांक 14/9/2023

Priyanka

**(प्रियंका आंबेकर)**

**अध्यक्ष पोलीस पाटील निवड समिती -2023 तथा**

**उपविभागीय दंडाधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी**

## प्रवर्गनिहाय भरावयाच्या पदाची माहिती.

| तालुका | आरक्षण ( प्रवर्ग ) | अ.ज. | विमाप्र | विजाअ | भजव | इमाव | EWS आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| माढा | महिला प्रवर्ग | तांदुळवाडी , रोपळे खुर्द, महादेववाडी | - | आकुंभे | - | अंजनगांव (खे) | तडवळे म., बिटरगाव | भोगेवाडी, ढवळस, शेडशिंगे, |
| | प्रवर्ग सर्वसाधारण | बुद्रुकवाडी | रुई | - | आढेगांव | वेणेगांव, सुर्ली, सापटणे भो, आकुलगांव, दारफळ, लोंढेवाडी | उजनी मा. | वडाचीवाडी अ.ऊ, शिंगेवाडी, कव्हे, भुताष्टे, शेवरे. |
| करमाळा | प्रवर्ग महिला | बाळेवाडी | बिटरगांव वां, | - | - | झरे, विहाळ, शेलगांव क, | - | जातेगांव |
| | प्रवर्ग सर्वसाधारण | हिसरे, कोर्टी, भगतवाडी, खडकी, वडाचीवाडी, हिंगणी, पारेवाडी | - | लव्हे, वडगांव द | - | पिंपळवाडी सावडी | वडगाव उ. बोरगाव | कोंढारचिंचोली, पोफळज, निमगांव ह, धायखिंडी, |

Priyanka

प्रियंका आंबेकर)

**अध्यक्ष पोलीस पाटील निवड समिती -2023 तथा**

**उपविभागीय दंडाधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी**